# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:01.04.2026** **वारः बुधवार**

1. जागतिक बाजारपेठेत एक विश्वासार्ह सेमीकंडक्टर पुरवठादार म्हणून भारत आपली भूमिका बळकट करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. जगातल्या सर्वात मोठ्या जनगणनेला आजपासून सुरुवात
3. नवीन आर्थिक वर्षापासून आर्थिक सुधारणा आणि नियमांमधील बदल लागू
4. नवी दिल्लीत साहित्य अकादमीच्या पुरस्कारांचं वितरण आणि
5. 9 नक्षलवाद्यांची गडचिरोली पोलिसांपुढे शरणागती

**पीएम सेमीकंडक्टर**

जागतिक बाजारपेठेत एक विश्वासार्ह सेमीकंडक्टर पुरवठादार म्हणून भारत आपली भूमिका बळकट करत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. गुजरातमधील साणंद इथल्या 'केन्स टेक्नॉलॉजी'च्या सेमीकंडक्टर प्रकल्पाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. भारताचा सेमीकंडक्टर उद्योग विविध राज्यांमध्ये बहरत असून असंख्य तरुणांसाठी नवीन संधी निर्माण करत आहे. या प्रयत्नांना आणखी व्यापक स्वरूप देण्यासाठी आम्ही आता 'सेमीकंडक्टर मिशन दुसऱ्या टप्प्यावर काम करत आहोत, असं पंतप्रधानांनी सांगितलं.

**जनगणना**

सरकारनं आजपासून सुरू होत असलेल्या जनगणना 2027 च्या पहिल्या टप्प्यात विचारण्यात येणारे 33 प्रश्न काल अधिसूचित केले. जगातील ही सर्वात मोठी जनगणना दोन टप्प्यात करण्यात येणार असून प्रथमच ती डिजिटल स्वरुपात केली जाणार आहे. ही जनगणना यापूर्वी झालेल्या जनगणनांपेक्षा वेगळी असल्याचं महानिबंधक आणि जनगणना आयुक्त मृत्युंजय कुमार नारायण यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत सांगितलं. पहिल्या टप्प्यात सुरुवातीला घरांची गणना आणि घरांचं सूचीकरण करण्यात येणार आहे. त्यात घराचा क्रमांक, मजला, घराची स्थिती आणि घरात राहणाऱ्या व्यक्तींची संख्या अशा माहितीचा समावेश असेल. पहिल्या टप्प्याचा अवधी आजपासून 30 सप्टेंबरपर्यंत ठरवण्यात आला आहे. यामध्ये स्व-गणनेचाही समावेश असून स्व-गणना पोर्टल 16 भाषांमधून उपलब्ध असेल, असंही जनगणना आयुक्तांनी नमूद केलं.

**संसद कामकाज**

आज लोकसभेत 'परकीय योगदान नियमन सुधारणा विधेयक, 2026' वर चर्चा होण्याचं नियोजित आहे. या विधेयकाद्वारे 'परकीय योगदान नियमन अधिनियम, 2010' मध्ये सुधारणा केली जाईल. तसेच, आज लोकसभेत 'जनविश्वास तरतुदींची सुधारणा विधेयक, 2026' यावरदेखील चर्चा होण्याचे नियोजित आहे. हे विधेयक काही कायद्यांमध्ये सुधारणा करून, गुन्ह्यांचे गुन्हेगारीकरण रद्द करण्याबरोबरच त्यांचे सुसूत्रीकरण केलं जाणार आहे. यामुळे 'जीवन सुलभता' आणि 'व्यवसाय सुलभता' यांसाठी 'विश्वास-आधारित प्रशासन' अधिक बळकट करता येईल. तर राज्यसभेत, 'केंद्रीय सशस्त्र पोलीस दल सामान्य प्रशासन विधेयक, 2026' तसंच 'दिवाळखोरी आणि नादारी संहिता सुधारणा विधेयक, 2026' यावर देखील चर्चा होणार आहे.

**पीएनजी मोहीम वाढ**

देशभर पीएनजीच्या विस्ताराला सध्या आलेली गती कायम ठेवण्यासाठी सरकारनं राष्ट्रीय पीएनजी मोहीमेच्या दुसऱ्या टप्प्याची मुदत येत्या 30 जूनपर्यंत वाढवली आहे. तसंच घरगुती पीएनजी जोडण्या देण्याच्या कामालाही आणखी वेग देण्याचे

निर्देशही सरकारनं शहर गॅस वितरण संस्थांना दिले आहेत. मार्च महिन्यात पीएनजीच्या तीन लाखांहून अधिक जोडण्या दिल्या असून त्यामध्ये घरं, व्यवसाय, वसतीगृहं, खानावळी आणि उपहारगृहांचा समावेश असल्याची माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं दिली. याशिवाय एक मार्चपासून दर दिवशी सरासरी 50 लाखांहून अधिक एलपीजी सिलिंडर वितरित करण्यात येणार असल्याचं मंत्रालयाकडून सांगण्यात आलं. देशात पेट्रोल, डिझेल, एलपीजी आणि पीएनजीचा पुरेसा साठा असल्याचंदेखील मंत्रालयानं स्पष्ट करताना अफवांना आळा घालण्यासाठी पत्रकार परिषदा घेऊन खरी माहिती देण्याचं आवाहन मंत्रालयानं राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना केलं.

**नवीन आर्थिक वर्ष**

नवीन आर्थिक वर्षाचा प्रारंभ आजपासून होत आहे. आजपासूनच देशात काही महत्त्वपूर्ण आर्थिक सुधारणा आणि नियमांमधील बदल लागू होणार आहेत. कर प्रणाली अधिक सोपी करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेला नवा प्राप्तीकर कायदा 2025 आजपासून लागू होत आहे. ऑनलाइन व्यवहार अधिक सुरक्षित करण्याच्या उद्देशानं, रिझर्व्ह बँकेने सर्व डिजिटल पेमेंट व्यवहारांसाठी द्वि-स्तरीय प्रमाणीकरण अनिवार्य केलं आहे; हा नियमही आजपासून लागू होत आहे. 2026-27 या आर्थिक वर्षासाठी फास्टॅगच्या वार्षिक पासच्या शुल्कामध्ये करण्यात आलेले बदलही आजपासून लागू होणार आहेत.

**जयशंकर-पोर्तुगाल**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल सायंकाळी त्यांचे पोर्तुगीज समपदस्थ पाउलो रँजेल यांच्याशी चर्चा केली. समाज माध्यमांवर डॉ. जयशंकर यांनी सांगितले की, दोन्ही बाजूंनी पश्चिम आशियातील संघर्षाबाबत चर्चा करण्याबरोबरच भारत आणि पोर्तुगाल यांच्यातील द्विपक्षीय सहकार्य अधिक बळकट करण्याबाबतही चर्चा झाल्याचं जयशंकर यांनी म्हटलं आहे.

**युद्धनौका**

भारतीय नौदलाने काल कोची येथील कोचीन शिपयार्ड लिमिटेडने बांधलेली दुसरी पाणबुडीविरोधी युद्धनौका, 'मालवान' हिचा आपल्या ताफ्यात समावेश करून घेतला. ही नौका भारतीय नौदलाच्या मानकांनुसार स्वदेशी बनावटीची असून मालवान या ऐतिहासिक किनारपट्टीवरील शहराचे नाव दिलेली ही नौका, छत्रपती शिवाजी महाराजांशी संबंधित समृद्ध सागरी वारसा दर्शवत असल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. ही युद्धनौका कमी तीव्रतेच्या सागरी मोहिमा आणि सुरुंग युद्धासाठी सक्षम आहे. यामध्ये वॉटरजेट प्रोपल्शन प्रणाली बसवण्यात आली असून टॉर्पेडो, पाणबुडीविरोधी रॉकेट्स, आधुनिक रडार आणि सोनार यांसारखी अत्याधुनिक साधने समाविष्ट आहेत.

**एलपीजी दरवाढ**

तेल विपणन कंपन्यांनी प्रमुख महानगरांमध्ये व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडर्सच्या किमतीत 195 रुपये 50 पैशांची वाढ केली आहे. 'इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड'च्या संकेतस्थळावरील माहितीनुसार, दिल्लीमध्ये व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडर्सची किरकोळ किंमत आता 2 हजार 78 रुपये, कोलकाता इथं 2 हजार 208, मुंबईमध्ये 2 हजार 31 रुपये आणि चेन्नईमध्ये 2 हजार 246 रुपये झाले आहेत. तथापि, घरगुती एलपीजी सिलिंडर्सच्या किमतीत मात्र कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**स्वतःचे तेल मिळवा**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल अमेरिकेच्या युद्ध प्रयत्नांना अधिक पाठिंबा देण्यास तयार नसलेल्या आपल्या मित्र राष्ट्रांवर नाराजी व्यक्त केली. इराणसोबतचा संघर्ष आणि इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्यामुळे ट्रम्प यांनी त्या राष्ट्रांना 'स्वतःचे तेल स्वतः मिळवा' असे सांगितले. अमेरिकेने इस्फहान या मध्यवर्ती शहरावर हल्ला केला तर इराणने पर्शियन आखातात एका पूर्ण भरलेल्या कुवैती तेलवाहू जहाजावर हल्ला केला होता. यानंतर ट्रम्प यांनी समाज माध्यमांवर ही प्रतिक्रिया दिली आहे.

**ट्रम्प**

इराणसोबत वाढता तणाव असूनही, होर्मुझच्या सामुद्रधुनीला सुरक्षित करण्याच्या प्रयत्नांमधून अमेरिकी सैन्य मागे घेण्यास ते तयार नसल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत, ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय मित्र राष्ट्रांबद्दल नाराजी व्यक्त करत या महत्त्वाच्या सागरी मार्गाच्या संरक्षणासाठी त्यांनी पुढे येऊन अधिक जबाबदारी घेण्याची गरज असल्याचं म्हटलं आहे.

**अपहरण**

इराकमधील बगदादमध्ये एका अमेरिकन महिला पत्रकाराचे अपहरण झाल्याची माहिती इराकी अधिकाऱ्यांनी दिली आहे. अपहरणासाठी दोन वाहनांचा वापर करण्यात आला होता, त्यापैकी एक वाहन जप्त करण्यात आलं असून एका संशयिताला अटक करण्यात आली आहे. तर फरार अपहरणकर्त्यांचा सुरक्षा दलांकडून शोध सुरू असून या घटनेचा प्रादेशिक संघर्षाशी संबंध अद्याप स्पष्ट झालेला नाही.

**पुरस्कार**

साहित्य अकादमीतर्फे 2025 या वर्षासाठी जाहीर करण्यात आलेल्या साहित्य पुरस्कारांचे काल नवी दिल्लीत वितरण करण्यात आले. मराठी भाषेसाठी महाराष्ट्रातील जळगाव येथील प्रसिद्ध चित्रकार आणि लेखक राजू बाविस्कर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मानचिन्ह, शाल आणि एक लाख रुपये रोख असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. देशातील मान्यताप्राप्त 24 भाषांमधील उत्कृष्ट साहित्यकृतींना यंदाचे साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात आले. साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या हस्ते बोडो, डोगरी, काश्मिरी, कोंकणी, मैथिली, नेपाली, ओडिया, संताली, सिंधी आदि भाषांमधील साहित्यिकांना यावेळी गौरविण्यात आलं.

**नक्षली-गडचिरोली**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत देशातील माओवादी चळवळीचा अस्त झाल्याची घोषणा केल्यानंतर, दुसऱ्याच दिवशी काल एकंदर 30 लाख रुपयांचं बक्षीस असलेल्या 9 नक्षलवाद्यांनी काल गडचिरोली पोलिसांपुढे शरणागती पत्करली. पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी भारताचं संविधान देऊन त्यांचा सत्कार केला. सध्या गडचिरोली जिल्ह्यात 6 सशस्त्र नक्षली शिल्लक आहेत. त्यातील एक जण गडचिरोली जिल्ह्याचा, तर अन्य पाच जण छत्तीसगडचे रहिवासी आहेत. मात्र, त्यांच्या कुठल्याही हालचाली गडचिरोली जिल्ह्यात दिसत नसल्याचं पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितलं. या नक्षल्यांनी शरणागती पत्करावी अन्यथा सशस्त्र कारवाईला सामोरं जावं लागेल, असा इशाराही नीलोत्पल यांनी दिला.

**झारखंड**

16 वी 'हॉकी इंडिया राष्ट्रीय उपकनिष्ठ महिला हॉकी अजिंक्यपद स्पर्धा 2026' आज रांची येथे सुरू होत असून. येत्या 12 एप्रिलपर्यंत ही स्पर्धा सुरू राहणार आहे. क्रीडा आणि युवा व्यवहार विभागाचे सचिव मुकेश कुमार हे या उद्घाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटमध्ये, काल रात्री पंजाब किंग्जने गुजरात टायटन्सचा कूपर कॉनलीच्या नाबाद 72 धावांच्या जोरावर तीन गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना गुजरात टायटन्सने 162 धावा केल्या होत्या. कूपरला 'सामनावीर' पुरस्काराने गौरविण्यात आलं. आज लखनौ इथं लखनौ सुपर जायंट्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना होणार आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.